www.sgbauonline.com

**AU–1978**

# B.A. (Part-III) Examination

## (Optional Subject)

## MARATHI LITERATURE

## (Literature of Modern Languages)

वेळ : तीन तास] [एकूण गुण : 100

सूचना :— सर्व प्रश्न आहेत

1. पुढील वाक्यांचे संदर्भासह स्पष्टीकरण करा :

(अ) "आम्ही सोरेंतो बंदरावर येऊन पोहोचलो. सोरेंतोत हिंडायला मोटारीपेक्षा घोड्यांच्या बग्याच चांगल्या. भुर्रकन इकडून तिकडे जायचे हे गाव नव्हे !"

किंवा

"एक पोरगी तर त्या पोलीस चौकीवर आपण आलेल्या त्या हिप्पीसारख्या गटाच्या नावाने सगळ्या देहाचा पाचोळा कसा केला याची कथा सांगत होती."

(आ) "कारण हे सान्फ्रान्सिस्को शहरदेखील कुणाच्या तरी चिरंतन पण अपूर्ण प्रेमात पडल्यासारखंच मला वाटतं !"

किंवा

"आतल्या सगळ्या वस्तू हिमशिल्पाच्या. कोच, टेबले, कपाटे, पलंग, स्वयंपाकघर—दगडातून शिल्प कोरावे तसे बर्फात कोरले आहे."

(इ) "असलं पापानं बोलू नका, म्या सनद्यासंग सरननाला गेलते, मुकाट्यानं झोपा, बोंबलू नका."

किंवा

"आय सोड. बाबाला सोड. आज त्येच्या हातानं मरायाचंच हाय मला. मव्हा जीवच घेऊ दे त्याला. सोड बाबाला सोड."

(ई) "तू मव्ह ऐकीनार न्हाय ? लगीन करणार न्हाय ? त तुवा मवा संबंध तुटला. तू मह्या घरात ऱ्हायचं न्हाय. चल निघ."

किंवा

"म्या तुम्हाला सोडून हितं ऱ्हानार न्हाय. म्या तुमच्यासंगच यिनार. तुमी मह्या बाळातपणाची काळजी करू नगा. देव निभावून न्हेईल. म्या तुमच्या संगच यिनार. जसं नसीबात व्हईल तसं व्हऊ द्या." 20



www.sgbauonline.com

www.sgbauonline.com

2. पु. ल. देशपांडे यांनी 'जावे त्यांच्या देशा' या पुस्तकातून केलेल्या प्रवासवर्णनाचा आढावा घ्या.

किंवा

हंगेरी या देशाचे चित्रण पु. ल. देशपांडे यांनी 'हंगेरी नाझ नवा नोंदी' या लेखातून कशा प्रकारे रेखाटले आहे 20

3. अशोक पवार यांनी 'बिराड' मधून भटक्या जमातीची व्यथा कशी मांडली आहे, स्पष्ट करा.

किंवा

'बिराड' या आत्मकथनाचा थोडक्यात आशय सांगा. 20

4. भाषेचे स्वरूप सांगून भाषेचे उपयोग लिहा.

किंवा

भाषेचे उच्चारण आणि लेखन यातील साम्यभेद विशद करा. 20

5. प्रमाणभाषा व बोलीभाषा यांचा परस्पर संबंध रेखाटा.

किंवा

पुढीलपैकी कोणत्याही दोनवर टिपा लिहा

(1) ध्वनि म्हणजे काय

(2) वाक्य विचार

(3) बोली

(4) लघुत्तम सार्थ घटक म्हणजे रूपिका होय. 20



www.sgbauonline.com